
# मीच तुमचा बाजीराव

## स्वाध्याय

### आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. ११ जानेवारी, १७३९

२. सांत्वनपर

३. साधन परिचय अर्थात महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास


४. बाजीराव बल्लाळ (पेशवा)

क्र.२. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. पौष शुद्ध ११ ला  २. तारापूर येथे
३. तोंडात गोळी लागल्याने

क्र.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. वेणूबाई
२. चिमणाजी भिंवराव

क्र.४. चौकट पूर्ण करा.




उत्तर: १. गंगाजान्हवीसमान  २. पिता-पुत्र

**क्र.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. बाजी भिंवराव _______ कैलासवासी जाहले.

अ. तोंडांत गोळी लागून

ब. पाठीवर गोळी लागून

क. पोटात गोळी लागून

ड. डोक्याला गोळी लागून

२. बहुत काय लिहिणें, _______.

अ. धीर धरावा हे विनंती.

ब. विवेक करावा हे विनंती.

क. हल्ला करावा हे विनंती.

ड. लोभ कीजे हे विनंती.

**उत्तर:** १. बाजी भिंवराव **तोंडांत गोळी लागून** कैलासवासी जाहले.

२. बहुत काय लिहिणें, **लोभ कीजे हे विनंती.**

**क्र.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. प्रस्तुत पत्र दुसरा बाजीराव पेशवा यांनी लिहिलेले आहे.

२. बाजीराव बल्लाळ हे संबोधन पहिला बाजीराव पेशवा यांच्यासाठी वापरले आहे.

३. लढाईत बाजी रेठरेकर मृत्युमुखी पडले होते.

४. 'मीच तुमचा बाजीराव' हे पत्र अभिनंदनपर स्वरूपाचे आहे.

**उत्तर:** १. असत्य　　२. सत्य

३. सत्य　　४. सत्य

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

### कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.

१. अनुचित : उचित : : अविवेक : ☐

२. शोक : दु:ख : : धैर्य : ☐

**उत्तर:** १. विवेक　　२. धीर

### कृ.२. खालील शब्दांना पर्यायी शब्द लिहा.

| कैलासवासी | विवेक | भाऊ | जाला |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ |

**उत्तर:** १. स्वर्गवासी　　२. विचार

३. बंधू　　३. झाला

### कृ.३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

१. **बाजू जाणे :** भक्कम आधार जाणे.

घरातला कर्ता मुलगा अचानक दगावल्याने संपूर्ण कुटुंबाची **बाजू गेली.**

२. **धीर धरणे :** संयम ठेवणे.

कोणतीही गोष्ट **धीर धरून**, नीट विचाराने केली, की विजय निश्चित होतो.

**कृ.४. कंसातील वाक्प्रचारांचा खालील वाक्यांत योग्य त्या जागी उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**

**(दु:खाचे परिमार्जन करणे, विवेक करणे, कैलासवासी होणे)**

१. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी सारासार विचार करावा.

२. बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांना जवळ करून त्यांचे दु:ख दूर केले.


३. हलक्याशा आजाराचे निमित्त होऊन गोविंदराव देवाघरी गेले.

उत्तर: १. कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी **विवेक करावा**.

२. बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांना जवळ करून त्यांच्या **दु:खाचे परिमार्जन केले**.


३. हलक्याशा आजाराचे निमित्त होऊन गोविंदराव **कैलासवासी झाले.**

**कृ.५. खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**




**उत्तर:** बाजी, राव, जीव, बारा, बाव, राजी

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**




**उत्तर:** सवाल

**कृ.७. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

शिवरायांचे गडकोट किल्ले म्हणजे ________ .

**उत्तर:** १. शिवरायांचे गडकोट किल्ले म्हणजे **मराठ्यांच्या स्वराज्याचे जिवंत साक्षीदारच आहेत.**

२. शिवरायांचे गडकोट किल्ले म्हणजे **एके काळचा अभिमानास्पद इतिहास आणि आजची अपमानास्पद दुर्दशा आहे.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | तोंडांत | | | |
| २. | दु:खाचे | | | |
| ३. | तुम्हास | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | तोंडांत | तोंडां | त | सप्तमी |
| २. | दु:खाचे | दु:खा | चे | षष्ठी |
| ३. | तुम्हास | तुम्हा | स | द्वितीया/चतुर्थी |

**कृ.२. वाक्यातील अव्यये ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

त्यांची मुले व चिमणाजी आप्पा आहेत, त्यांचेहि त्याजपेक्षा अधिक चालेल.

**उत्तर:** व – उभयान्वयी अव्यय

त्याजपेक्षा – शब्दयोगी अव्यय

अधिक – क्रियाविशेषण अव्यय

## ड. माझे मत

**कृ.१. 'रक्ताच्या नात्यांपेक्षा हृदयाची नाती अतूट असतात' यासविषयी तुमचे मत लिहा.**

**उत्तर:** वरील विधान मला पूर्णपणे पटते. नाते, मग ते रक्ताचे असो वा मनाने मानलेले असो, हृदयाच्या तारा जुळणे म्हणजेच विचार पटणे फार महत्त्वाचे असते. कित्येकदा, प्रवासात अनोळखी माणसं आपली विचारपूस करतात, आपली काळजी घेतात, तेव्हा तर ते कोणत्या नात्याच्या व्याख्येत बसतं हेही समजत नाही. अनेकदा कठीण प्रसंगी रक्ताच्या नात्यातली माणसं मदतीला येत नाहीत; पण मित्र, सहकारी, अनोळखी माणसं मात्र अचानक धावून येतात. अशा वेळी वरील वाक्य तंतोतंत पटतं; कारण नातं हे रक्ताच्या बंधांवर आधारलेलं नसून, त्यात मनाचे, हृदयाचे बंध अधिक दृढ असावे लागतात.

## सारांश लेखन

**'मीच तुमचा बाजीराव' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

पहिले बाजीराव पेशवे यांनी आपल्या सैन्यातील धारातीर्थी पडलेल्या एका सैनिकाच्या मातेस लिहिलेले हे सांत्वनपर पत्र आहे. या पत्रात बाजीरावांनी तारापुरावरील हल्ल्यात बाजी भिंवराव तोंडात गोळी लागल्याने कैलासवासी झाले हे सांगून, तो आपला भाऊच होता असे म्हटले आहे. ईश्वराने अनुचित केले हे सांगतानाच, दु:ख बाजूला सारून विचाराने वागण्यास ते सुचवितात. बाजींची मुले व भाऊ चिमणाजी भिंवराव यांचा आधार आहेच; पण तरी मीच तुमचा बाजीराव आहे, असा विचार करून धीर धरावा असा दिलासा त्यांनी पत्रातून बाजीच्या आईस दिला आहे. एक राजा असूनही सैन्यातील सैनिकांविषयी, त्यांच्या घरच्यांविषयी बाजीरावांना वाटणारी आस्था, जिव्हाळा या पत्रातून दिसतो.